सोमवार दि. २४ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जिवंतपणी मूलभूत सुविधांसाठी संघर्ष आणि मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठीही परवड

# स्मशानभूमी अभावी पावसात अर्धवट जळाले सरण!

## दोन हजारांहून अधिक लोकसंख्या, तरी हक्काची स्मशानभूमी नाही; प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात संताप

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील दावेडी गावात मृत्यूनंतरही नागरिकांच्या नशिबी संघर्षच असल्याची संतापजनक परिस्थिती समोर आली आहे. गावात मोठी लोकसंख्या असतानाही संबंधित समाजबांधवांसाठी स्वतंत्र आणि मूलभूत सुविधांनी युक्त स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने अंत्यविधीसाठी नागरिकांना मोकळ्या जागेचा आधार घ्यावा लागत आहे. त्यातच पावसाळ्यात अंत्यसंस्कार करताना निर्माण होणाऱ्या अडचणींमुळे मृत व्यक्तीला सन्मानाने अंतिम निरोप देणेही कठीण झाले आहे.

नुकतेच दावेडी येथील रहिवासी जनाबाई बाबुराव भांडेकर (वय ७५) यांचे निधन झाले. मात्र गावात स्वतंत्र स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध नसल्याने नातेवाईकांना मोकळ्या जागेत अंत्यविधी करण्याची वेळ आली. दुःखाचा प्रसंग असतानाच अंत्यसंस्कार सुरू असताना अचानक पावसाने हजेरी लावली. त्यामुळे सरण अर्धवट जळले आणि उर्वरित लाकडे पावसाने भिजली. अंत्यविधी पूर्ण करण्यासाठी नातेवाईकांना पुन्हा लाकडे आणावी लागली. मृत व्यक्तीच्या अंतिम संस्काराच्या वेळीच कुटुंबीयांना अशा परिस्थितीला सामोरे जावे लागल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**दोन हजारांहून अधिक समाजबांधव; तरी स्वतंत्र स्मशानभूमीचा अभाव**

दावेडी गावाची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १,५१९ होती. मात्र सध्या गावाची लोकसंख्या दोन हजारांहून अधिक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या गावात नागरिकांच्या मूलभूत गरजांपैकी एक असलेली स्मशानभूमी उपलब्ध नसणे ही गंभीर बाब असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



स्मशानभूमी ही केवळ अंत्यविधीची जागा नसून मृत व्यक्तीला सन्मानाने अंतिम निरोप देण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत सुविधा आहे. मात्र दावेडीतील नागरिकांना या सुविधेपासून वंचित राहावे लागत असल्याने प्रशासनाच्या विकासकामांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. स्मशानभूमीसाठी निश्चित जागा आणि अंत्यविधीसाठी शेड नसल्याने पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होते. पाऊस सुरू झाल्यानंतर सरण पेटवणे, अंत्यसंस्कार पूर्ण करणे आणि नातेवाईकांना सुरक्षितपणे उभे राहणेही कठीण होते.

जनाबाई भांडेकर यांच्या अंत्यविधीच्या वेळी घडलेल्या प्रकारामुळे ही समस्या पुन्हा ऐरणीवर आली आहे. पावसामुळे सरण अर्धवट जळल्यानंतर पुन्हा लाकडे आणून अंत्यविधी पूर्ण करण्याची वेळ नातेवाईकांवर आली. दुःखाच्या प्रसंगी प्रशासनाच्या मूलभूत सुविधांचा अभाव किती वेदनादायी ठरू शकतो, याचे हे ज्वलंत उदाहरण असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

दावेडी गावात स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामस्थ आणि समाजबांधवांनी तहसील कार्यालय तसेच ग्रामपंचायतीकडे वारंवार मागणी केल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र अद्याप या मागणीवर ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

गावातील नागरिकांच्या मते, स्मशानभूमीसाठी जागा निश्चित करणे, तिचे सपाटीकरण करणे, अंत्यविधीसाठी शेड उभारणे, पाण्याची सुविधा करणे तसेच अंत्यविधीच्या ठिकाणी जाण्यासाठी योग्य रस्ता उपलब्ध करून देणे या बाबी प्रशासनासाठी अशक्य नाहीत. मात्र इच्छाशक्तीच्या अभावामुळे हा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचा आरोप केला जात आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. मात्र दावेडीतील नागरिकांना मृत्यूनंतर अंतिम संस्कारासाठीही संघर्ष करावा लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. ''मृत व्यक्तीला सन्मानाने अंतिम निरोप देण्यासाठीही जर जागा उपलब्ध होत नसेल, तर विकासाचा नेमका दावा कोणासाठी?'' असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. गावात रस्ते, पाणी, स्वच्छता यांसारख्या प्रश्नांसोबतच स्मशानभूमीची समस्या हीही प्रशासनाने गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे दावेडी येथे तातडीने स्वतंत्र स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर स्मशानभूमीच्या ठिकाणी अंत्यविधीसाठी कायमस्वरूपी शेड, पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ता, प्रकाश व्यवस्था आणि इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

पावसाळ्यात अंत्यविधीच्या वेळी नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना होईपर्यंत प्रशासनाने *(पान २ वर)*

---

# पैगंबर मुहम्मद यांच्या शिकवणीत मानवतेच्या समस्यांवरील उपाय – मौलाना मुश्ताक अहमद फलाही

**जालना । प्रतिनिधी**

वहदत-ए-इस्लामी हिंद, जालना यांच्या वतीने 'रहमत-ए-आलम ' अभियानांतर्गत शनिवारी (२२ ऑगस्ट) रात्री इशाच्या नमाजानंतर बागबान मस्जिद कदिम येथे जाहीर भाषणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आत्महत्या, स्त्रीभ्रूणहत्या, अमली पदार्थांचे व्यसन तसेच वायू प्रदूषण यांसारख्या सामाजिक समस्यांवर पैगंबर मुहम्मद यांच्या शिकवणुकीच्या माध्यमातून उपाययोजनांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थी अम्मार यासिर यांच्या पवित्र कुराण पठणाने झाली. त्यानंतर लियाकत अली खान यासिर जलनवी यांनी प्रास्ताविक केले. वहदत-ए-इस्लामी हिंदतर्फे १६ ते २६ ऑगस्टदरम्यान 'रहमत-ए-आलम ' अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.



या अभियानाच्या माध्यमातून समाजासमोरील विविध गंभीर प्रश्नांवर जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. आत्महत्या, स्त्रीभ्रूणहत्या, अमली पदार्थांचे व्यसन आणि वायू प्रदूषण यांसारख्या समस्यांवर नैतिक व सामाजिक दृष्टिकोनातून उपाय शोधण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रमुख वक्ते मौलाना मुहम्मद मुश्ताक अहमद फलाही यांनी पैगंबर मुहम्मद यांच्या जीवनकार्यावर व शिकवणीवर प्रकाश टाकला. ''पैगंबर मुहम्मद मुस्तफा यांना संपूर्ण मानवजातीसाठी कृपा म्हणून पाठविण्यात आले,'' असे त्यांनी सांगितले.

पैगंबरांच्या शिकवणुकीचे पालन केल्याने व्यक्तीला जीवनात तसेच परलोकात यश मिळू शकते, असा संदेश त्यांनी दिला. आत्महत्या, स्त्रीभ्रूणहत्या, अमली पदार्थांचे व्यसन आणि पर्यावरणीय प्रदूषण यांसारख्या समस्यांकडे केवळ सामाजिक किंवा प्रशासकीय प्रश्न म्हणून न पाहता त्यामागील नैतिक मूल्ये आणि मानवी जबाबदारीचाही विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मानवाने संयम, सदाचार, परस्पर *(पान २ वर)*

---

## जालना मनपा भरती: 'प्रत्येक प्रभागातून १२ स्थानिक तरुणांना संधी द्या'; नगरसेवकांना ३ शिफारसींचा अधिकार देण्याची ॲड. महेश धन्नावत यांची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडून जालना महानगरपालिकेच्या ९९३ अधिकारी व कर्मचारी पदांच्या आकृतिबंध आणि सेवा नियमांना नुकतीच मंजुरी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर मनपा भरती प्रक्रिया केवळ नोकरभरती न राहता ती स्थानिक पातळीवरील नागरी समस्यांच्या निराकरणासाठी प्रभावी ठरावी, यासाठी ॲड. महेश धन्नावत यांनी जिल्हाधिकारी तथा जालना महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन सादर केले आहे.

**भरतीचे विकेंद्रीकरण काळाची गरज**

ॲड. महेश धन्नावत यांनी आपल्या निवेदनात नमूद केले की, महापालिकेत ९९३ पदांची मोठी भरती होणार असल्याचे समोर आल्यानंतर स्थानिक बेरोजगारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मात्र, ही नियुक्ती करताना शहराच्या सर्व भागांचे प्रतिनिधित्व होणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण मनपा क्षेत्रातील प्रत्येक प्रभागातून (वॉर्ड/प्रभाग) किमान १२ स्थानिक उमेदवारांची निवड करण्यात यावी.

**नगरसेवकांना शिफारसीचा अधिकार मिळावा**

प्रभागातील प्रत्यक्ष अडचणी आणि भौगोलिक गरजांची नगरसेवकांना नेमकी जाणीव असते. या मुद्द्याकडे लक्ष वेधत, संबंधित प्रभागातील नगरसेवकांना किमान ३ स्थानिक लोकांची नावे नामनिर्देशित करण्याचा अधिकार महानगरपालिका प्रशासनाने द्यावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी ॲड. धन्नावत यांनी केली आहे.

''स्थानिक वॉर्डातील व्यक्तीला आपल्या परिसरातील पाणी, रस्ते, स्वच्छता व इतर मूलभूत नागरी समस्यांची खडान् खडा माहिती असते. प्रत्येक प्रभागातून १२ प्रतिनिधी आणि नगरसेवकांच्या शिफारसीतून येणारे मनुष्यबळ यामुळे महापालिका प्रशासनाला भविष्यात वॉर्डनिहाय प्रश्न तात्काळ आणि प्रभावीपणे सोडवणे सोपे जाईल.''

सर्वपक्षीय नेत्यांनी शासन दरबारी पाठपुरावा करावा: ॲड. धन्नावत यांचे आवाहन

जालना शहराचा विकास आणि स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र येण्याची गरज असल्याचे ॲड. महेश धन्नावत यांनी म्हटले आहे.

या मागणीला *(पान २ वर)*

---

# दिव्यांगाच्या हितासाठी झटणाऱ्या ॲड रीमा खरात यांना भविष्यात संधी देणार

**जालना - प्रतिनिधी**

दिव्यांगाच्या हितासाठी झटून धडाकेबाज सामाजिक कार्य करणाऱ्या नगरसेविका ॲड. रीमा संदीप खरात- काळे यांना भविष्यात संधी देऊन सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन भाजपचे नेते तथा माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी आज येथे दिले.

ॲड. रीमा खरात- काळे व संदीप खरात यांनी छत्रपती संभाजी महाराज उद्यानात दिव्यांगासाठी सुरू केलेल्या नवीन उपक्रमात ते बोलत होते. जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष संगीताताई गोरंट्याल, नगरसेवक शशिकांत घुगे, नगरसेविका अनामिका पांगारकर, सामाजिक कार्यकर्ते निलेश गोर्डे,

माजी नगरसेवक जीवन सले, इंजिनिअर एस. एन. कुलकर्णी, संजय देठे, अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे आदींची यावेळी विशेष उपस्थित होती.

यावेळी बोलतांना गोरंट्याल पुढे म्हणाले की,

छत्रपती संभाजी महाराज उद्यान परिसरात दिव्यांग बांधवांसाठी आपणही एक दिवसाचा कार्यक्रम आयोजित करणार आहोत. आपण कन्याकुमारीपासून ते जम्मूपर्यंत व पश्चिम बंगालपासून ते गुजरातपर्यंत दौरे केले असून, दिव्यांग बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच कार्यक्रम आपण पाहून आपण समाधानी झालो आहोत. कार्यक्रमाचे आयोजन आणि दिव्यांग बांधवांसाठी करण्यात येत असलेल्या कार्याचे कौतुक करत गोरंट्याल यांनी ॲड. रीमा खरात यांना भविष्यात संधी व सहकार्य करण्याचे आश्वासन देत दिव्यांगाच्या



विशेष कार्यक्रमाचा एक दिवसाचा संपूर्ण खर्च आपण करणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. दिव्यांगांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी निधी उपलब्ध करून देण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी महापौर वंदना मगरे यांनी जालना शहरात दिव्यांगाच्या हितासाठी सुरू असलेल्या उपक्रमाचे कौतुक सांगितले.

यावेळी बोलतांना ॲड. रीमा संदीप खरात- काळे म्हणाल्या की, जालना शहरातील दिव्यांग बांधवांसाठी मालमत्ता करात ५० टक्के सवलत देण्याची मागणी केली होती. या मागणीला महापौर वंदना मगरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, आपणास जालना महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मधून निवडून येण्याची संधी केवळ दिव्यांग बांधवांच्या आशीर्वादामुळे मिळाली आहे. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी आपल्याला राजकीय क्षेत्रात काम करण्याची संधी दिली असून, दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी आपण सदैव कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी *(पान २ वर)*

**दिव्यांग व्यक्तींसाठी रविवारी मोफत उद्यान भेट व नाश्ता**

**दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक बांधिलकी जपत एक विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक रविवारी जालना येथील मोतीबाग येथे सकाळी १० ते १२ या वेळेत दिव्यांग व्यक्तींना मोफत प्रवेश पासेस तसेच नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे.**

**पूर्णतः अपंग असलेल्या व्यक्तींना मोतीबाग येथे घेऊन येणाऱ्या व्यक्तीस ५०० रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येणार आहे. तसेच त्या ठिकाणी अपंग व्यक्तींना आवश्यक असलेले स्टिक, वॉकर, कमोड चेअर, कुबड्या आदी साहित्याची नोंदणी करण्यात येणार असून, संबंधित साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.या उपक्रमासाठी संदीप खरात यांच्या कार्यालयामार्फत आवश्यक मदत व साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे ॲड रीमा संदीप खरात- काळे यांनी यावेळी जाहीर केले.**

---

# काँग्रेसच्या मंठा परतूर घनसावंगी येथील आढावा बैठकांना मोठा प्रतिसाद

### यापुढील काळात काँग्रेस फक्त निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी देणार - खासदार डॉक्टर कल्याण काळे



**जालना- प्रतिनिधी**

मंठा परतूर घनसावंगी तालुक्यात काँग्रेसच्या संघटनात्मक आढावा घेणाऱ्या बैठका पार पडल्या. खासदार डॉ. कल्याण काळे त्यांनी मार्गदर्शन करताना काँग्रेस पक्षाने या पूर्वी अनेकदा मित्र पक्षांना संधी दिली येणाऱ्या काळात काँग्रेस पक्षाच्या निष्ठावंत व सर्वसामान्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांना उमेदवारी देऊन काम करण्याची संधी देणार आहे. त्यासाठी पक्ष संघटनेत काम करून जनतेपर्यंत जाऊन काँग्रेस पक्षाची विचारधारा समजावून सांगण्याचे व विकासासाठी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी राहून येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठा विजय मिळवून देण्यासाठी सज्ज राहावे. असे आवाहन केले.कार्यकर्ते व जनतेच्या सेवेसाठी मी २४ तास उपलब्ध असेल अशी ग्वाही खासदार कल्याण काळे यांनी याप्रसंगी दिली.

यावेळी मार्गदर्शन करताना जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री कल्याण दळे म्हणाले की जालना जिल्हा काँग्रेसच्या सर्व विभागांच्या पदाधिकाऱ्यांच्या लवकरच *(पान २ वर)*

# संपादकीय...

## अपघाताची वाट पाहणारे प्रशासन किती काळ?

टेंभुर्णी-जाफ्राबाद मार्गावरून धावणाऱ्या वाहनांचा बेफाम वेग, गावातील चौक व फाट्यांवर वेग नियंत्रणाचा अभाव, कर्णकर्कश हॉर्न आणि दुचाकीस्वारांकडून होणारे वाहतूक नियमांचे उल्लंघन या सगळ्या बाबी आता केवळ तक्रारींच्या विषयापुरत्या राहिलेल्या नाहीत. त्या अपघाताला आमंत्रण देणाऱ्या परिस्थितीचे संकेत आहेत. गावातून जाणारा रस्ता म्हणजे केवळ वाहनांसाठीचा मार्ग नसतो. त्याच रस्त्यावर शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, पादचारी, दुचाकीस्वार आणि स्थानिक व्यापारी यांचीही रोजची ये-जा असते. त्यामुळे गावाच्या हद्दीत प्रवेश करताना वाहनांचा वेग आपोआप नियंत्रित होणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र गाव, चौक किंवा फाटा आला तरी काही वाहनचालकांच्या वेगावर कोणताही परिणाम होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रश्न येथे केवळ वाहनचालकांच्या बेशिस्तीचा नाही. या बेशिस्तीवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा कुठे आहे? हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. आरटीओ, वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ग्रामपंचायत अशा अनेक यंत्रणांची रस्ते सुरक्षेमध्ये भूमिका आहे. मात्र एखाद्या मार्गावर सातत्याने नियमभंग होत असेल, तर अधूनमधून दंडात्मक कारवाई करून प्रश्न सुटत नाही. त्यासाठी सततची उपस्थिती, तपासणी आणि प्रतिबंधात्मक व्यवस्था आवश्यक असते. 'कारवाई' कागदावर नको, रस्त्यावर दिसायला हवी वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांची तपासणी, वाहनचालकांचे परवाने, वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, विमा, कागदपत्रे, हेल्मेटचा वापर, अल्पवयीनांकडून वाहन चालविले जात आहे का, मद्यपान करून वाहन चालविले जात आहे का, याची तपासणी नियमित झाली तरच नियमभंग करणाऱ्यांना धाक बसेल. विशेषतः अवजड वाहनांच्या बाबतीत अधिक दक्षता आवश्यक आहे. मोठ्या वाहनाचा वेग, वाहनाची लांबी आणि वजन लक्षात घेता गावातील चौकात अचानक समोर आलेल्या पादचाऱ्याला किंवा दुचाकीस्वाराला बचावाची संधी अत्यंत कमी असते. म्हणूनच प्रशासनाने 'अपघात झाल्यावर पंचनामा' या मानसिकतेतून बाहेर पडून 'अपघात होऊ नये' या दृष्टिकोनातून काम करण्याची गरज आहे. फक्त आरटीओला दोष देऊन प्रश्न सुटणार नाही आरटीओच्या दुर्लक्षाचा आरोप गंभीर आहे; परंतु संपूर्ण जबाबदारी केवळ आरटीओवर ढकलणेही योग्य ठरणार नाही. रस्ता सुरक्षित ठेवणे ही बहुविभागीय जबाबदारी आहे.

गावातील धोकादायक चौक कोणते? कुठे गतिरोधक आवश्यक आहे? कुठे झेब्रा क्रॉसिंग हवे? कुठे दिशादर्शक फलक नाहीत? कोणत्या ठिकाणी रात्री प्रकाशव्यवस्था अपुरी आहे? या प्रश्नांची संयुक्त पाहणी प्रशासनाने करायला हवी. विशेषतः शाळा, महाविद्यालये, दवाखाने, बाजारपेठा आणि धार्मिक स्थळांच्या परिसरात वेग नियंत्रण आणि पादचारी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य मिळायला हवे. 'तरुणांची सुरक्षा समिती' कल्पना स्वागतार्ह; मात्र ती पर्यायी पोलीस व्यवस्था होऊ नयेग्रामस्थांनी मांडलेली 'तरुणांची सुरक्षा समिती' ही कल्पना निश्चितच सकारात्मक आहे. स्थानिक तरुणांना सहभागी करून धोकादायक ठिकाणांची माहिती प्रशासनाला देणे, रस्ता सुरक्षा जनजागृती करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक शिस्तीबाबत जागृती करणे शक्य आहे. मात्र, या समितीने स्वतः वाहनचालकांना अडवणे, दंड करणे किंवा कायदा हातात घेणे अपेक्षित नाही. नागरिकांचा सहभाग हा प्रशासनाला पूरक असावा, प्रशासनाचा पर्याय नव्हे. 'एक स्वाक्षरीचे निवेदन' पुरेसे ठरणार का? ग्रामस्थ निवेदन देणार, आंदोलनाचा इशारा देणार आणि त्यानंतर प्रशासन काही दिवस हालचाल करणार, अशी नेहमीची पद्धत आता बदलण्याची वेळ आली आहे. निवेदन मिळाल्यानंतर संबंधित विभागांनी प्रत्यक्ष पाहणी करून धोकादायक ठिकाणांची यादी, आवश्यक उपाययोजना आणि त्यासाठीची कालमर्यादा निश्चित करावी. नागरिकांना केवळ आश्वासन न देता कोणत्या ठिकाणी काय उपाय केला जाणार आहे, हे स्पष्ट करावे. कारण रस्ते सुरक्षेच्या बाबतीत विलंबाची किंमत अनेकदा मानवी जीव असते. आज स्पीड ब्रेकर नसेल तर उद्या बातमी अपघाताची असू शकते टेंभुर्णीतील चौकात गतिरोधकाची गरज असेल तर तो बसविण्यासाठी अपघाताची वाट पाहण्याचे कारण काय? झेब्रा क्रॉसिंग आवश्यक असेल तर नागरिकांनी रस्ता ओलांडताना जीव मुठीत घेण्याची वेळ का यावी? 'वाहन हळू चालवा' असा फलक लावण्याइतकीही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी एखादा गंभीर अपघात होणे आवश्यक आहे का? प्रशासनाने या प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत. वाहतूक नियम मोडणारा वाहनचालक दोषी आहेच; पण नियमभंग सातत्याने होत असूनही त्यावर नियंत्रण ठेवण्यात यंत्रणा अपयशी ठरत असेल, तर प्रशासनाची जबाबदारीही निश्चित केली पाहिजे. टेंभुर्णी-जाफ्राबाद मार्गावरील समस्या आजच गांभीर्याने घेतली, तर उद्याचा अपघात टाळता येऊ शकतो. अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यानंतर नेहमीप्रमाणे शोकसभा, पंचनामा, नुकसानभरपाई आणि चौकशी यापलीकडे काहीही उरणार नाही. रस्ते नागरिकांच्या जीवावर प्रयोग करण्यासाठी नसतात. प्रशासनाने अपघाताची वाट पाहू नये; अपघात होण्याआधीच जागे व्हावे.



राखी पौर्णिमा अवघ्या काही दिवसावरच येऊन ठेपले असून बाजारपेठ राखण्यासाठी सज्ज झाले आहे व लहान मुलांसाठी कार्टूनच्या राख्या साठ रुपये नवरा बायकोचे राख्या जोडी राख्या ८० रुपये अशा विविध प्रकारच्या राख्या बाजारात उपलब्ध आहेत ***छायाचित्र किरण खानापुरे***

# प्रत्येक क्षण नवं निर्मितीची संधी देत असतो - देवेंद्र भुजबळ

मुंबई - व्यक्तीच्या आयुष्यात प्रत्येकक्षणी नवीन काही करण्याची संधी मिळत असते. तुमच्या मनात प्रेरणा असेल, इच्छाशक्ती मजबूत, दांडगी असेल, भले परिस्थिती प्रतिकूल असेल परंतु मनस्थिती चांगली असेल तरच तुम्ही सतत काही नवं निर्मिती करू शकता, म्हणून मनस्थिती महत्वाची आहे, असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी केले. मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर शब्दांच्या वाटेवर या कार्यक्रमात पूनम चांदोरकर यांनी त्यांची नुकतीच मुलाखत घेतली, त्याप्रसंगी ते बोलत होते.



आपण ''शब्दांच्या वाटेवर'' कसे वळलात ? असा प्रश्न मुलाखतकार चांदोरकर यांनी विचारला असता भुजबळ म्हणाले की, सहा वर्षांचा होईपर्यंत मी बोलू शकत नव्हतो. त्यानंतर बोलायला शिकलो. मूकबधिर कसे असतात, अगदी तशी अवस्था माझी होती. मग मी अशा क्षेत्राकडे वळलो की, दररोज बोलावे लागत असे कारण मी बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी सेल्समन म्हणुन काम करीत असे . मात्र अशा नफेखोरी करणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करण्यापेक्षा अशा क्षेत्रात जायचे की,ज्या मुळे आपल्याला जनजागृती करता येईल आणि म्हणुन मी पत्रकारितेकडे वळलो. नगर कॉलेजमध्ये शिकत असताना, दैनिक समाचार मध्ये उपसंपादक कम वार्ताहर म्हणून काम केले. पुढे पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिट्यूट मधून पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केला. नंतर पुण्यातील दैनिक केसरीमध्ये उपसंपादक, त्यानंतर केसरीचेच प्रकाशन असलेल्या साप्ताहिक सह्याद्री मध्ये विशेष प्रतिनिधी म्हणून काम केले. तेथे कव्हरस्टोरी लिहिल्या. पत्रकारितेत मात्र मर्यादा असतात. जसे वाचक साक्षर असायला हवा. वृत्तपत्राचे सरक्युलेशन मर्यादित असते. म्हणून पत्रकारिता सोडून मी दूरदर्शनमध्ये आलो. १९८६ ते १९९१ पर्यंत असे पावणेसहा वर्ष मी दूरदर्शनमध्ये आधी सहायक निर्माता आणि १९९१ साली यूपीएससी मार्फत निवड झाल्याने निर्माता म्हणून काम केले. पुढे महाराष्ट्राच्या बाहेर बदली होणार नाही, या आणि अन्य काही बाबींचा विचार करून शासनाच्या माहिती व जनसंपर्क खात्यात रुजू झालो. जिल्हा माहिती अधिकारी, उपसंचालक आणि संचालक झालो. मात्र या सर्व प्रशासकीय प्रवासात मी लिहिणं कधी सोडलं नाही, असे त्यांनी सांगितले.

साहित्याची गोडी कशी निर्माण झाली ? या प्रश्नावर बोलताना भुजबळ म्हणाले की, माझे वडील सेल्समन होते. सुरवातीपासूनच मला वाचनाची गोडी होती. दोन-दोन महिने वडिल बाहेरच असत. ते घरी आले की, खूप मिठाया आणीत असत. वाड्यातील शेजार पाजारच्यांनाही ते त्या देत असत . परंतु पुस्तकांसाठी माझा त्यांच्याकडे आग्रह असायचा. त्यामुळे ते घरी आले की, परिकथा, गोष्टींचे पुस्तके आणून देत असत. आमचे घर अकोला येथील टेलिफोन ऑफिसजवळ होते.

टेलिफोन ऑफिसची खूप मोठी लायब्ररी होती. त्यात तासन तास बसून मी वाचन करीत असे. वाचन म्हणजे शिक्षणाचा पायाच. मला लिखाणाची आवड होती म्हणून लिखाणापासून मी नाळ तुटू दिली नाही. ते म्हणाले की, ज्या परिस्थितीतून माझी जडणघडण झाली, त्यामुळे माझा ठाम समज झाला आहे की, परिस्थितीपेक्षा माणसाची मनस्थिती महत्वाची आहे. आज अनुकूल परिस्थिती असली तरी छोट्या छोट्या गोष्टींनी मुलं-मुली नाराज होतात. मग नको ते निर्णय घेतात. आकडेवारीतच सांगायचे झाल्यास गेल्या दहा वर्षात नैराश्यातून आयआयटीमधील पहिल्या ते चौथ्या वर्षांपर्यंतच्या जवळपास १२२ मुला-मुलींनी आत्महत्या केल्या आहेत. तर एमबीबीएस , एमडी, एम एस सारख्या अभ्यासक्रमातील १२५ जणांनी गेल्या पाच वर्षांत आत्महत्या केल्या आहेत. एव्हढेच काय पोलीस दलातील कर्मचारी -अधिकारी धट्टेकट्टे असतात, सक्षम असतात असा आपला समज असतो. पण गेल्या पाच वर्षांत ४५ जणांनी आत्महत्या केल्या. या सगळ्यांचा विचार केल्यास यासाठी कारणे वेगवेगळी असू शकतात. म्हणुन माझे म्हणणे असते की ,बाह्य निकष न बघता आपली आवड ओळखून करिअर निवडल्यास आपण प्रत्येक क्षण आनंदात जगाल. यासाठी विद्यार्थ्यांना विविध अभ्यास क्रमांची माहिती मिळावी यासाठी मी मंत्रालयात माहिती संचालक असताना, आमच्या महान्यूज पोर्टलवर '' करिअर नामा'' हे सदर सुरू केले. त्यात विविध अभ्यासक्रमांची माहिती देत असे. राज्यातील विविध वृत्तपत्रेही ही माहिती प्रसिद्ध करीत असत. त्यातूनच माझे ''करिअरच्या नव्या दिशा '' हे पुस्तक प्रकाशित झाले . मनःस्थिती भक्कम असायला पाहिजे. तीच जर नसेल तर शारीरिक, मानसिकदृष्ट्या किंवा तुमचा स्वतःवर विश्वास नसेल तर सगळं काही असून नसल्यासारखे होते. म्हणूनच ज्या व्यक्तींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळविले आहे अशा व्यक्तींच्या प्रेरणादायी कथा असलेली ११ प्रेरणादायी पुस्तके लिहिल्याचे त्यांनी सांगितले.

तुमच्या पोर्टलद्वारे काही व्यक्ती पुढे आल्या त्याबाबत सांगा, असे विचारल्यावर ते म्हणाले, आज पर्यंत पोर्टल वर प्रसिद्ध झालेल्या लेख मालांपैकी चौदा लेख माला पुस्तक रुपात आल्या आहेत.

या सर्व पुस्तकांचे संपादन मी केले आहे.

आज जगात भौतिक, आर्थिक, तांत्रिक प्रगती मोठ्या प्रमाणात होत आहे तर दुसऱ्या बाजूला सामाजिक, मानसिक, भावनिक अधोगतीही वेगाने होत आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी कसा मार्ग काढायचा? असा आजचा मोठा प्रश्न आहे. बालक, पालक, तरुण,वृद्ध असा सर्वामधील संवाद तुटत चालल्याची खंतही भुजबळ यांनी या मुलाखती दरम्यान व्यक्त केली. आजच्या तंत्रज्ञानामुळे माणूस जवळ येत चालला पण मनाने मात्र तो दूर जात आहे. ही विसंगती जी काही निर्माण होत चालली आहे, त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. आपण पत्रकार , लेखक, संपादक आणि प्रकाशक अशा विविध भूमिकेत आहात. अशावेळी आपल्या प्रेक्षक, वाचकांना काय सांगाल ? या प्रश्नाच्या उत्तरात बोलताना भुजबळ म्हणाले की, आपण जिथे आहात, ज्या जागेवर आहात विशेषतः वेगवेगळ्या क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आहात. शासनाचे २० लाख कर्मचारी, केंद्र सरकारचे कर्मचारी, बँक कर्मचारी -अधिकारी या सगळ्यांनी खुर्चीत जाऊन बसणे हे आपले उद्दिष्ट न ठेवता, खुर्चित जाऊन बसल्यानंतर आपण लोकांसाठी काय काम करू शकतो, आपल्या पद्धतीने समाजासाठी काय योगदान देऊ शकतो याचा विचार केला पाहिजे, असे सांगून आज आपण घडलो परंतु लाखो लोक आपल्यामागे आहेत, त्यांना सेवा देऊन सक्रीय राहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. भुजबळ यांनी सुरवातीलाच दूरदर्शनच्या या जुन्या वास्तूत आल्याचा आनंद झाल्याचे सांगत जुन्या ठिकाणी आलो की जुन्या आठवणी जागृत होतात असे सांगून या वास्तूने मला आर्थिक स्थैर्य दिले, नावलौकिक दिला आहे. आज जो काही मी उभा आहे, त्याचे सर्व श्रेय या वास्तुला आहे, असे सांगून या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल दूरदर्शनचे आभार मानले.

**शब्दांकन : शेषराव वानखेडे,**
**ज्येष्ठ पत्रकार.**
**ह.मु. गांधीनगर, गुजरात**
**९१ ९८६९४ ८४८००**

# दशावतारी स्त्री कलाकार यश जळवी यांचा सत्कार ; जनजागृती सेवा संस्थेने केला दशावतारी लोककलेचा सन्मान

**कुडाळ - गुरुनाथ तिरपणकर**

परमेश्वराने भुतलावर एक चमत्कार घडवला आहे तो म्हणजे कोकण.श्री देव परशूरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेली कोकण भुमी अर्थात जणू स्वर्गच!

निसर्गाने नटलेल्या या कोकणाला लोककला ही लाभलेली आहे.अशातीलच एक लोककला म्हणजे दशावतार! या दशावतार लोककलेने अनेक कलाकार घडविले.आणि या दशावतार कलेमध्ये स्त्री भूमिका साकारत आपल्या कलेद्वारे एक वलय निर्माण केले.पदवीधर असुन सुद्धा या कलेमध्ये स्वताला झोकून दिले.दशावतार लोककलेचा प्रचार प्रसार आणि जनजागृती करण्यासाठी स्वतःला झोकून देणारे असे सुप्रसिद्ध सौंदर्यवती ( स्त्री भुमिका साकारणारे) दशावतारी कलाकार कु. यश जळवी यांचा शुक्रवार दिनांक -२१ऑगस्ट २०२६ रोजी जनजागृती सेवा संस्था बदलापूर (रजि.)या संस्थेतर्फे

श्री सोमेश्वर कलामंच सामाजिक संस्था रजि चे संस्थापक श्री सहदेव धर्णे, जिव्हाळा सेवाश्रम कुडाळ,चे संस्थापक श्री सुरेश बिर्जे, तसेच जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक श्री गुरुनाथ तिरपणकर, शिक्षक, नाटककार श्री संतोष सांगळे यांच्या



हस्ते यश जळवी यांच्या निवासस्थानी मानपत्र,शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित श्री सहदेव धर्णे, श्री सुरेश बिर्जे, श्री संतोष सांगळे यांचा जनजागृती सेवा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी यश ची आजी श्रीमती सुरेखा विनायक जळवी, त्याचबरोबर यश ची आई सौ भारती सुशांत जळवी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.निवास्थानी येऊन सत्कार केल्यानंतर यश,यशची आई,आजी भाराऊन गेले.

संपूर्ण महाराष्ट्रात जनजागृती सेवा संस्था ही निःस्वार्थी पणे कार्य करत आहे.आकर्षक मानपत्र बनविण्यासाठी मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे तसेच संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

पान १ ४ व वरुन...

### स्मशानभूमी अभावी...

तात्पुरती सुरक्षित व्यवस्था करावी, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे. दावेडीतील या गंभीर प्रश्नाची तहसील प्रशासन आणि ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. केवळ आश्वासने किंवा कागदी कार्यवाही न करता स्मशानभूमीसाठी जागा निश्चित करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा आहे.

जिवंतपणी मूलभूत सुविधांसाठी संघर्ष आणि मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठीही परवड, दावेडीतील ही परिस्थिती प्रशासनाच्या विकासाच्या दाव्याला आरसा दाखवणारी आहे. आता तरी प्रशासनाने जागे होऊन नागरिकांच्या या मूलभूत आणि संवेदनशील प्रश्नावर तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### पैगंबर मुहम्मद...

आदर, कुटुंबीय जबाबदारी आणि समाजहिताच्या मूल्यांचे पालन केल्यास अनेक सामाजिक समस्यांवर नियंत्रण मिळविता येऊ शकते, असेही मौलाना फलाही यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लियाकत अली खान यासिर जलनवी यांनी केले. त्यांनी उपस्थितांचे आभार मानले. अखेरीस मौलाना मुहम्मद मुश्ताक अहमद फलाही यांच्या प्रार्थनेने जाहीर भाषणाचा समारोप झाला.

'रहमत-ए-आलम ' अभियानाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्याचा आणि पैगंबर मुहम्मद यांच्या शिकवणीतील मानवतावादी संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### जालना मनपा भरती...

पाठिंबा देऊन आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, खासदार डॉ. कल्याण काळे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्यासह जिल्ह्यातील सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे हा विषय नेऊन सकारात्मक निर्णय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी आग्रही मागणीही त्यांनी केली आहे.

### दिव्यांगाच्या हितासाठी...

सांगितले. यावेळी दिव्यांगाच्या हितासाठी महापौर वंदना मगरे यांनी ५१ हजार रुपये, एस. एन. कुलकर्णी यांनी ५१ हजार रुपये, माजी नगरसेवक जीवन सल्ले यांनी ५१ हजार रुपये, तर संजय देठे यांनी ११ हजार रुपये देण्याची घोषणा केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अविनाश काकडे, अलोक सारवडीकर, मनोज झिने, विशाल वाघमारे, हर्षल काळे, सोहेल शेख, सागर म्याका,तेजस्विनी दाभाडे, आकाश दाभाडे, साळवे बाबा ,साक्षी रायमल, राहुल मांगधरे, राहुल दांडगे, मैत्री खरात, मंगेश देशमुख, राजेंद्र काळे, सौरभ भिसे, सुमित म्हस्के, अनिल अवचार, रामकृष्ण अवचार, अभय दसरे, सलमान खान, शहबाज शेख, शाहरुख शेख एजाज सय्यद, अमजद खान, लहू लोखंडे, गजानन आदींनी परिश्रम घेतले.

### काँग्रेसच्या मंठा...

नियुक्त्या करण्यात येणार असून यामध्ये उपेक्षित कार्यकर्त्यांना मोठी संधी देणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना श्री कल्याण दळे म्हणाले की भारतीय जनता पक्षाने शेतकरी विद्यार्थी बेरोजगार महिलांचा खोटे आश्वासन देऊन भ्रमनिरास केला असून विकासाच्या नावावर फक्त भ्रष्टाचार करण्याचे काम केले आहे.राम मंदिरातील आपल्याच हस्तंका मार्फत त्यांनी भक्तांना लुबाडण्याचे काम केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंठा व घनसावंगी तालुका काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन खासदार डॉक्टर कल्याणराव काळे व जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण दळे यांनी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या दौऱ्याच्या वेळी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, विधानसभा प्रमुख प्रभाकर पवार,अल्पसंख्यांक विभागाचे बदर चाऊस, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कोळकर, अविनाश चव्हाण, अशोक उबाळे, कांतीलाल बनसोडे, राजाभाऊ कुलकर्णी, गणेश बोराडे,योगिता धांडगे,निरीक्षक गणेश राऊत सहभागी होते. यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीत तालुका अध्यक्ष विवेक घारे, बालासाहेब आकात, श्रीरंग कामठे,शहर अध्यक्ष अँड एकनाथ देवडे, रामप्रसाद जाधव, माजी अध्यक्ष पंजाबराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस ॲड प्रदीप लेकुरवाळे,शरद चव्हाण ,रामप्रसाद खरात, निळकंठ वायाळ, शरद बोराडे,

जिल्हा सरचिटणीस राजेंद्र सातपुते, शाहिद शेख,अलीभाई शेख, राजेंद्र आरेकर ,केरुबा उंबरे

तुकाराम गायकवाड,रामेश्वर येवले, अशोक कामठे, ॲड नितीन कोल्हे, कैलास जाधव, विजय शेडगे ,अब्दुल रहीम शेख ,अंबड तालुका अध्यक्ष कल्याण तारडे,विठ्ठल बडे,दुर्गादास मोहिते

विशाल पवार,गणेश मोरे,कृष्णा कामठे, चक्रधर सस्ते इत्यादींची उपस्थिती होती . खासदार डॉक्टर कल्याण काळे यांच्या या दौऱ्यास पदाधिकारी कार्यकर्त्यांसह जनतेतून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी ठिकठिकाणी काँग्रेस पक्षात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला यात प्रामुख्याने माजी जिल्हा परिषद सदस्य श्री उद्धवराव पवार इत्यादींचा समावेश आहे.

### जालन्यात असंख्य...

गणेश दामू थोरात, सापोन थोरात, रंजीत दिगंबर काळे, दत्तात्रय मोठे, रोहन संतोष पांडव, संजय निलखण, ऋषी कदम, बाबासाहेब महके, ब्रह्मा कदम, बंडू थोरात, अनिल पाखरे, दिलीप सुखाराम गायकवाड, एकनाथ बाळराज, विजय कांबळे, रमेश महापुरे, विकास नाणवटे, किशोर रतन माळी, रंगनाथ हिवाळे, राम बाबुराव हिवाळे, प्रभु बाबुराव हिवाळे, मोहन कुंडलीक कसबे, डेव्हिड कसबे, प्रकाश कसबे, दत्ता निकाळजे, अखिल शेख, छबू लाखे, संतोष लाखे, विपुल मोठे, विशाल आठवले, विकास लाखे, बंटी पाखरे, दादाराव साळवे, दिव्यश खरात आदींनी शिवसेनेत प्रवेश केला.

महिला कार्यकर्त्यांमध्ये लक्ष्मी श्रीखंडे, कोकिळा शिलवंत, रमाबाई मगर, पुजा शिलवंत, अर्चना आठवले, सुवर्णा शिलवंत, योगिता शिंदे, संगीता चव्हाण, ममता खरात, निर्मला बनसोडे, रिमा खेत्रे, अनुराधा वाघ, लता पाचिपांडव, सविता पाचिपांडव, निर्मला पाचिपांडव, संगीता खांडेभराड, हवाबाई म्हस्के, दीपाली खरात, विद्या कवनकर यांच्यासह अनेकांनी पक्षप्रवेश केला.

**प्रमुख पदाधिकारी उपस्थित**

यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, पांडुरंग डोंगरे, जावेद खान, शेख नजीर, जफर खान यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजप आणि काँग्रेसमधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या या पक्षप्रवेशामुळे आगामी राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक आक्रमक होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

### नऊ महिन्यांपासून...

संबंधित शाळेत मागील सहा वर्षांपासून संस्थेचा नियमित मुख्याध्यापक नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. सेवा ज्येष्ठतेच्या निकषानुसार पात्र मुख्याध्यापकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र, अद्याप याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे तांदळे यांनी सांगितले. या प्रकरणाची दखल घेत सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना संबंधित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन देण्याबाबत आपल्या स्तरावरून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. वेतनाचा प्रश्न तातडीने निकाली काढून कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी अविनाश तांदळे यांनी केली.

# बहुपक्षीय लोकशाहीला वाळवी लावण्याचा प्रयत्न,आपला राष्ट्रग्रंथ संविधान जगात सर्वोत्तम - ज्येष्ठ संपादक तुळशीदास भोईटे

**मुंबई - रवींद्र मालुसरे**

संसदीय लोकशाही बहुपक्षीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान घडवताना भारतातील विविधता लक्षात घेत बहुपक्षीय संसदीय लोकशाही आपल्याला दिली. पण गेल्या काही दशकांमध्ये राजकीय स्वार्थासाठी पक्षांतरे आणि आता तर थेट पक्षचोरीचा आरोप होत, पक्षांचंच अस्तित्व संपवण्यास सुरुवात केली आहे. बहुपक्षीय संसदीय लोकशाहीला अशी वाळवी लागत पक्षच संपू लागले, तर लोकशाहीच उरेल कशी? मुद्दा फक्त ठाकरे, शिंदे, पवार, फडणवीस, मोदी, शाह, गांधी या राजकीय नेत्यांपुरता मर्यादित नाही. मुद्दा फक्त शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, भाजपा या पक्षांपुरता सुद्धा मर्यादित नाही. त्याची व्यापकता समजणं, गरजेचं आहे. हा संसदीय लोकशाहीच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे असे मत राजकीय विश्लेषक मुक्तपीठचे संपादक तुळशीदास भोईटे यांनी वृत्तपत्र लेखकांच्या समोर मांडले.



काशिनाथ धुरू हॉल ट्रस्टच्या दादर सार्वजनिक वाचनालयात मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा ७७ वा वर्धापन दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी भोईटे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्रमुख कार्यवाह विश्वनाथ पंडीत तर पोलादपूर तालुक्यातील विद्यादानाचे कार्य निस्वार्थीपणे करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवराम उतेकर, माजी अध्यक्ष विजय ना कदम, माजी अध्यक्ष प्रकाश नागाने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लोकशाहीचा गाभा संविधानात वसलेला असतो आणि त्या लोकशाहीला जिवंत ठेवण्याचे काम लेखणी करीत असते. शब्दांमध्ये समाजाला दिशा देण्याची, व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची आणि सत्याचा आरसा दाखवण्याची ताकद असते. याच विचारधारेला केंद्रस्थानी ठेवून मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने वृत्तपत्र लेखक दिनाचे औचित्य साधून या विशेष वैचारिक व्याख्यानाचे आयोजन केले होते.

भोईटे पुढे असेही म्हणाले की, हातातील दोन विषय बाजूला ठेवून देशवासीयांसमोर आलेली सध्याची राजकीय परिस्थिती सर्वांनाच अस्वस्थ करून सोडत आहे, त्यामुळे पुस्तक लिहिण्यासाठी मी तिसरा विषय हाती घेतला तो संविधानाचा. आपल्या राष्ट्रग्रंथाचे महत्व अधोरेखित करण्याचा.आपल्या राष्ट्रग्रंथासोबत सभोताली आजवर घडत आलेल्या, घडत असलेल्या, घडू शकणाऱ्या राजकारणाचा वेधही घेण्याचा अभ्यासपूर्ण प्रयत्न केला आहे. सभोवतालचं वास्तव प्रत्येकाला कळलं पाहिजे. राष्ट्रग्रंथ संविधानात नेमकं काय आहे, तोच जगातील सर्वोत्तम कसा तेही सोप्या शब्दात समजलंच पाहिजे. त्यातून त्याच्या कसोटीवर सारं काही पाहण्याची सवय लागलीच पाहिजे.

शिवराम उतेकर यांनी परिस्थिती कशीही असो माणसाने आपल्या आयुष्याचे ध्येय ठरवले पाहिजे, त्याचबरोबर आपण समाजाचे काही देणं लागतो या भावनेतून विशेषतः परिस्थतीशी झगडणाऱ्या लोकांसोबत आपण माणुसकीच्या भावनेतून उभे राहायला हवे. वृत्तपत्र लेखक हेच काम हातात लेखणी धरून निर्भिडपणे आणि निस्वार्थीपणे करीत असतो. वर्तमानातील सामाजिक व राजकीय घडामोडींचे भान ठेवत, संविधानाच्या मूळ मूल्यांशी निष्ठा राखून समाजहितैषी लेखन कसे घडायला हवे यावर आज सखोल विचारमंथन झाले आहे.

संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी १९४९ पासूनच्या संस्थेच्या चळवळीचा आढावा घेतला. वृत्तपत्र लेखक हा ऐकतो, बोलतो, वाचतो आणि मग लिहितो, याच अनुषंगाने आज दिल्ली दरबारी डाव प्रतिडाव चाललेल्या व देशभर घुसळण चाललेल्या महत्त्वाच्या विषयावर आपण चर्चा करणार आहोत. आदर्श वार्ताहर संपादक पंकजकुमार पाटील यांचा प्रभाकर पाध्ये स्मृती पुरस्कार प्रदान करून यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम प्रमुख दिगंबर चव्हाण तर आभार प्रदर्शन कार्यवाह नितीन कदम यांनी केले. कार्यक्रम प्रमुख सुनील कुवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष रमेश सांगळे, माजी अध्यक्ष प्रकाश नागणे, दत्ताराम गवस, राजन देसाई, रामचंद्र जयस्वाल, अब्बास आतार, श्रीनिवास डोंगरे, विवेक तवटे, सतीश भोसले, दिलीप दळवी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# २२ वर्षीय सार्थकच्या अवयवदानामुळे चौघांना मिळाले जीवनदान!

**पुणे - प्रतिनिधी**

पुण्यातील कात्रज येथील गंगोत्री सोसायटीत राहणाऱ्या २२ वर्षीय सार्थक चुंबळकर या तरुणाचे ११ ऑगस्ट रोजी दुर्दैवी बाईक अपघातात निधन झाले. एकुलत्या एक मुलाच्या निधनाचे दुःख असह्य असतानाही त्याचे पालक दीपक आणि ममता चुंबळकर यांनी घेतलेला अवयवदानाचा निर्णय समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी आणि माणुसकीचा आदर्श ठरणारा आहे. सार्थकच्या अवयवदानामुळे मुंबईतील दोन आणि नाशिकमधील दोन अशा चार रुग्णांना जीवनदान मिळाले. सार्थकला सामाजिक कार्याची तसेच वाद्य वाजविण्याची विशेष आवड होती. गणपती उत्सव, दहीहंडी, होळी आणि नवरात्र यांसारखे सण उत्साहाने साजरे करण्यासाठी तो नेहमीच पुढाकार घेत असे. तो व्हायोलिनही उत्तम वाजवत असे. स्वावलंबी जीवन जगण्याची त्याची मनापासून इच्छा होती. नोकरी करत शिक्षण घेणारा सार्थक भविष्यात एमबीए करण्याचे स्वप्न पाहत होता. स्वतःची कामे स्वतः करण्याची आणि कोणावरही अवलंबून न राहण्याची त्याची वृत्ती त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होती.



सार्थकच्या निधनानंतर त्याच्या पालकांसमोर दुःखाचा डोंगर उभा राहिला. एकुलता एक मुलगा गमावल्याचे दुःख शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. मात्र, या दुःखातूनही त्यांनी अवयवदानाचा निर्णय घेतला आणि आपल्या मुलाला एका अर्थाने समाजात अमर केले. त्यांच्या या निर्णयामुळे चार गरजू रुग्णांना नवजीवनाची आशा मिळाली आहे.

आजही अनेक रुग्ण अवयव उपलब्ध न झाल्यामुळे उपचाराच्या प्रतीक्षेत आहेत. अशा परिस्थितीत अवयवदानाबाबत समाजात व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे. चुंबळकर दाम्पत्याने भविष्यात अवयवदान आणि देहदानाच्या चळवळीत सक्रियपणे सहभागी होऊन जनजागृती करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे, हीदेखील कौतुकास्पद बाब आहे. अवयवदान हे केवळ दान नसून मृत्यूनंतरही एखाद्याच्या जीवनाला अर्थ देणारे महान कार्य आहे. आपल्या अवयवांमुळे दुसऱ्या व्यक्तीला नवजीवन मिळू शकते, ही जाणीव प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे. त्यामुळे अवयवदान आणि देहदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी या चळवळीत पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि सार्थकचे नातेवाईक गणेश हिरवे यांनी व्यक्त केलेला ''मरावे परी अवयवदानरूपी उरावे'' हा विचार सार्थकच्या कुटुंबाच्या निर्णयाचे सार सांगणारा आहे. सार्थकचे आयुष्य अल्प ठरले; मात्र त्याच्या अवयवांमुळे चार जणांच्या आयुष्यात नव्या आशेचा प्रकाश निर्माण झाला. दुःखाचे रूपांतर माणुसकीच्या कार्यात करणाऱ्या चुंबळकर कुटुंबाला मनापासून सलाम!

# गोदावरी मुळे यांचे निधन



**जालना - प्रतिनिधी**

जालना येथील जिजामाता नगरमधील रहिवासी गोदावरी साहेबराव मुळे यांचे रविवारी ( दि. २३) दीर्घ आजाराने निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ७७ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले असा परिवार आहे. सुंदरलाल सावजी नागरी सहकारी बँकेचे व्यवस्थापक राजेश मुळे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराबद्दल पत्रकार सय्यद अफसर यांचा काँग्रेस अल्पसंख्याक विभागातर्फे सत्कार

**जालना - प्रतिनिधी**

इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनच्या वतीने जालना येथे आयोजित करण्यात आलेल्या ९व्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनात पत्रकार सय्यद अफसर यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल जालना जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या वतीने सय्यद अफसर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने सामाजिक प्रश्न, जनसामान्यांच्या समस्या तसेच विविध घडामोडींना प्रभावीपणे वाचा फोडण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनने त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या या यशाबद्दल काँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करत भविष्यातही पत्रकारितेच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य अधिक प्रभावीपणे घडावे, अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष अब्दुल रफिक रशीद, प्रदेश काँग्रेस सरचिटणीस ॲड. राम कुराडे, भागवत घाटे, चंद्रकांत रत्नपारखे, अमजद खान पाशा, वहाब कुरेशी, अन्सार भाई कुरेशी, पत्रकार अशफाक पटेल यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.




सय्यद अफसर यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# शेख अब्दुल रहीम शेख बाबू यांना प्रतिष्ठित 'द आयकॉनिक इंडिया अवॉर्ड' प्रदान

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे ( ) संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम शेख बाबू यांना त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल आणि निस्वार्थ सेवेबद्दल यंदाचा मानाचा 'द आयकॉनिक इंडिया अवॉर्ड' ( ) जाहीर करण्यात आला आहे. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून त्रेतायुग फाउंडेशन ( ) व अस्तित्व () यांच्या संयुक्त विद्यमाने या राष्ट्रीय पुरस्काराची घोषणा करण्यात आली. विद्यार्थी-शिक्षकांसाठी केलेले कार्य, सातत्यपूर्ण शिक्षणिक आणि सामाजिक योगदान आणि उत्कृष्ट नेतृत्व कौशल्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. शेख अब्दुल रहीम शेख बाबू यांच्या या यशाबद्दल विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



# जालना समाजकार्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा



**जालना - प्रतिनिधी**

दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप प्राचार्य डॉ.मधू खोब्रागडे हे उपस्थित होते सर्वप्रथम उप प्राचार्य डॉ.मधू खोब्रागडे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले त्यानंतर उप प्राचार्य डॉ.मधू खोब्रागडे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले यावेळी कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी रमेश गजर सांस्कृतिक समन्वयक प्रा.डॉ.दीपक बुक्तरे, प्रा. डॉ. नरसिंग पवार,प्रा.डॉ. सुधीर गायकवाड,जगन्नाथ मलवार, प्रकाश दांडगे, शाम कांबळे, विष्णू भोसले, दत्ता रेवले,ऋषी पाटील,शिवाजी भुतेकर,सुंमत माने,भीभीषन शेजूळ, संजय गोरे,संजय गाडे,अनिल वाघमारे, संदीप जगताप आदी उपस्थित होते.

# १३ तासात ३०० किमी सायकलिंग पूर्ण :कैलास झोळगे ठरले पोडियम फिनिशर्स

जालना (प्रतिनीधी) व्हिएतनाम येथील जागतिक पातळीवर स्पर्धेत जालन्याचे नाव उंचीवर नेऊन ठेवणारे आयर्नमॅन कैलास झोळगे यांनी ३०० किलोमिटर सायकलिंग केवळ १३ तासात पूर्ण करत आणखी एका विक्रमाची नोंद आपल्या नावावर करून जालना जिल्ह्याचे नावलौकिक करत सुपर रेडओनर किताब मिळवला.एस.आर.असलेले आय.पी.एस.संजय बारकुंड यांनीही या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत १४ तास ३० मिनिटात सदर अंतर पूर्ण केले तसेच अनिरुद्ध झुंबड यांनी १८ तास १० मिनिटात अंतर पूर्ण करून सुपर रेडओनर किताब पटकावला आहे.



फ्रान्सच्या ऑडेक्स क्लब पॅरिसियन () या जागतिक संस्थेच्या मान्यतेने दि.१६ ऑगस्ट २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील फिनिक्स क्लब येथून सकाळी ६ वाजता बी.आर.एम. सायकल स्पर्धेला सुरुवात करण्यात आली होती. छत्रपती संभाजीनगर ते बीड आणि परत छत्रपती संभाजीनगर अशी तब्बल ३०० किलो मिटर जागतिक स्तरावर अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या सायकल स्पर्धेत जालन्याच्या स्पर्धकांनी चमकदार कामगिरी केली. या यशाबद्दल डॉल्फिन स्पोर्ट्स ग्रुपचे अध्यक्ष नथुमल नाथानी, प्रिन्सिपल काबरा, अर्जुन गेही, रमेश मगरे, तोष्णीवाल, अनिल मालपानी, रमेश तोतला, विठ्ठल गाडेकर, खेरुडकर, कोरके, सिद्धिविनायक झोळगे, प्रणव किनगावकर, स्पोर्ट्स ग्रुप, क्रीडाप्रेमी, सायकल संघटना, मित्र परिवार सर्व अधिकारी आदींनी आयपीएस संजय बारकुंड,आयर्नमॅन कैलास झोळगे आणि अनिरुद्ध जुंबड यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**हवा,ऊन,पाऊस,मात्र जिद्द कायम राखत स्पर्धेत मिळवले अव्वलस्थान**

अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेत सहभागी झालेल्या जालन्याच्या स्पर्धकांनी जिद्दीच्या बळावर आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही हवामान,खड्डे, पाऊस,ऊन आद्रता,चढ - उताराचा आणि दुसरीकडे वेळेचे कडक बंधन अशा आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करत जिद्द आणि अफाट सहनशक्तीच्या बळावर सदर ३०० किलोमिटरचे अंतर वेळेच्या आत पूर्ण करून कैलास झोळगे यांनी अव्वल स्थान मिळवत जालन्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

# महाप्रजापती संस्थेद्वारे नशामुक्ती मार्गदर्शन

**दत्ता देशमुख**

हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयात महाप्रजापती संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नशामुक्ती मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करून निरोगी व संस्कारक्षम जीवनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

मार्गदर्शन करताना व्यसनांमुळे शरीर, मन, कुटुंब आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. सिगारेट, तंबाखू, गुटखा आदी व्यसनांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन कर्करोगासारखे आजार होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून कायम दूर राहावे, असा संदेश देण्यात आला.

''एकीकडे मोबाइल, पैसा आणि आधुनिक साधने आहेत; तर दुसरीकडे संस्कार, आरोग्य आणि चारित्र्य आहे. जीवनातील वेळ व ऊर्जा विधायक कार्यासाठी वापरा,'' असे आवाहन करण्यात आले.



तसेच तणाव आणि व्यसनाधीनता कमी करण्यासाठी ध्यानधारणा (मेडिटेशन), योग, वाचन, खेळ आणि विविध सकारात्मक उपक्रमांचा आधार घेण्याचा सल्ला देण्यात आला. मोबाइलचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता ज्ञान, शिक्षण आणि चांगल्या गोष्टींसाठी करावा, असेही विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी नशामुक्तीची प्रतिज्ञा घेतली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी कुलकर्णी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# एआयच्या माध्यमातून महिलांनी सक्षमीकरणाची नवी संधी साधावी - विजया रहाटकर

## ‘यशोदा एआय’ उपक्रमांतर्गत ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला’ या विषयावरील क्षमता बांधणी कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

एआयच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, रोजगार, व्यवसाय व दैनंदिन जीवनात प्रगती करण्यासाठी नवी साधने उपलब्ध होत आहेत. महिलांनी एआयचे स्वरूप समजून घेऊन त्याचा योग्य वापर करावा. उपलब्ध संधींचा लाभ घेऊन एआयला सक्षमीकरणाचे साधन बनवावे, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘यशोदा एआय’ उपक्रमांतर्गत ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला’ या विषयावरील क्षमता बांधणी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह, उपसचिव डॉ. पद्मश्री बेनाडे, उपायुक्त कृष्णा राठोड, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी कोमल कोरे, व्याख्याते उन्मेष जोशी, स्मिता कासार आदी उपस्थित होते.




श्रीमती विजया रहाटकर म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्याची बाब नसून वर्तमानातील गरज आहे. महिलांचे डिजिटल सक्षमीकरण, सुरक्षितता व आत्मविश्वास वाढविणे हा ‘यशोदा एआय’ उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. माहिती संकलन व विश्लेषण, आरोग्य सेवा, तपास प्रक्रिया तसेच दैनंदिन प्रशासकीय कामांना एआयमुळे गती मिळू शकते. कामाच्या स्वरूपानुसार एआयचा योग्य पद्धतीने वापर करणे आवश्यक आहे.

महिला उद्योजक व बचत गटातील महिलांनीही एआयचा उपयोग व्यवसायवृद्धीसाठी करावा, व्यवसायासाठी प्रभावी संदेश तयार करणे, समाजमाध्यमांवर प्रचार करणे तसेच व्यवसायाशी संबंधित सर्जनशील साहित्य तयार करण्यासाठी एआयची मदत घेता येते. महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती असणे आवश्यक असून बालविवाह आणि कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ यांसारख्या समस्यांविरोधात संघटितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. गृहिणींच्या दैनंदिन कामातही एआय उपयुक्त ठरू शकतो, मुलांना अभ्यासातील अवघड विषय सोप्या पद्धतीने समजावून घेण्यासाठी, घरातील कामांचे नियोजन करण्यासाठी तसेच विविध माहिती मिळविण्यासाठी एआयचा वापर करता येतो. एआयचा वापर करताना स्वतःची विचारशक्ती कायम ठेवावी, गोपनीयतेचे संरक्षण करावे व तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल सुरक्षिततेबाबत महिलांनी अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे. छायाचित्रांमध्ये फेरफार, डीपफेक, आवाजाची नक्कल, ऑनलाइन फसवणूक, सायबर छळ, बनावट खाती आणि वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांपासून सावध राहण्याचे त्यांनी आवाहन केले. प्रत्येक महिलेला कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलभूत माहिती असणे हे आता जीवनकौशल्याचा एक भाग बनले आहे. ‘एआय सखी’च्या माध्यमातून एक महिला एआय शिकून इतर महिलांना त्याचे ज्ञान देईल आणि अशा प्रकारे डिजिटल सक्षमीकरणाची साखळी देशभर निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री. जैन म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार संगणकाच्या तुलनेत अत्यंत वेगाने होत आहे. संगणकाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनण्यासाठी २० ते ३० वर्षे लागली होती, तर कृत्रिम बुद्धिमत्तेने अल्पावधीतच आपल्या जीवनावर प्रभाव निर्माण केला आहे. या तंत्रज्ञानातील धोके समजून घेऊन सुरक्षिततेची काळजी घेणे, विशेषतः महिलांनी सायबर तंत्रज्ञानाची माहिती घेऊन सक्षम होणे गरजेचे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून हुबेहूब आवाज व चित्रफिती तयार करून फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे अशा आवाजावर किंवा चित्रफितीवर तत्काळ विश्वास न ठेवता त्याची खात्री करणे आवश्यक आहे. आभासी जगातील सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी तंत्रज्ञानाची माहिती व आवश्यक दक्षता महत्त्वाची आहे. ‘यशोदा एआय’ उपक्रमातील मार्गदर्शन महिलांना सक्षम करण्यास उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले. श्री. येडगे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे साधन आहे. त्याचा उपयोग दैनंदिन कामे सुलभ करण्याबरोबरच महिला सुरक्षेसाठीही करता येऊ शकतो. तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध असून कृत्रिम बुद्धिमत्ता सहज वापरता येणारे तंत्रज्ञान आहे. त्यामुळे महिलांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा आत्मविश्वासाने वापर करून स्वतःला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सक्षम करावे.

प्रास्ताविकात श्रीमती आवाडे म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता हे महिलांच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे साधन असून महिलांनी त्याचा सकारात्मक वापर करून आपली प्रगती व उज्ज्वल भवितव्य घडवावे. ‘यशोदा एआय’ उपक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थिनी, गृहिणी, उद्योजिका तसेच प्रौढ महिलांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या या बदलत्या युगात महिलांनी त्याचा आत्मविश्वासाने स्वीकार करून ज्ञान, कौशल्य व आर्थिक सक्षमीकरणासाठी त्याचा उपयोग करावा, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महिलांनी दैनंदिन वापरात एआयचा कसा उपयोग करायचा, याविषयी स्मिता कासार तसेच सायबर सुरक्षा विषयावर उन्मेष जोशी, ‘पॉश’ जनजागृती विषयावर दिपाली श्रीवास्तव आणि डिजिटल मार्केटिंग विषयावर शिवम गर्ग यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# जालन्यात असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

## आ. अर्जुन खोतकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भाजपचे अतिक खान, जुनेद मिर्झा यांच्यासह काँग्रेसचे इरशाद शेख शिवसेनेत दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील राजकीय घडामोडींना रविवारी नवे वळण मिळाले. शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भाजप आणि काँग्रेसमधील पदाधिकारी तसेच असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. दर्शना बंगला येथे झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यामुळे जालना शहरातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढल्याचा दावा पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

या पक्षप्रवेशात भाजपचे जालना जिल्हा सरचिटणीस अतिक खान, भाजप प्रदेश सचिव कामगार मोर्चाचे जुनेद मिर्झा यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. तसेच काँग्रेसचे जालना जिल्हा उपाध्यक्ष इरशाद शेख यांनीही आपल्या असंख्य समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केला.

पक्षप्रवेश केलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्वागत केले. आगामी काळात शिवसेनेची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नव्या कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.



**‘राजकारण म्हणजे जनसेवा’**

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, ‘‘राजकारण हे केवळ पदासाठी किंवा सत्तेसाठी नसून सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी असते.’’ शिवसेनेत प्रवेश केलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या परिसरातील नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विकासाच्या प्रक्रियेत योगदान देणे हीच खरी जनसेवा असल्याचे खोतकर यांनी स्पष्ट केले. नवीन कार्यकर्त्यांनी पक्षाची विचारधारा आणि ध्येयधोरणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासोबतच नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले.

गरजू नागरिकांना शासनाच्या विविध योजना व सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी. नागरिकांचे प्रश्न प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

**‘नव्या कार्यकर्त्यांना सन्मानाची संधी’**

‘‘शिवसेनेत आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला योग्य सन्मान आणि काम करण्याची संधी दिली जाईल. संघटना मजबूत करण्यासोबतच जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे काम करावे,’’ असा संदेश आमदार खोतकर यांनी दिला.

जालना शहर आणि जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याची गरज आहे. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**मोठ्या संख्येने कार्यकर्ते शिवसेनेत**

या पक्षप्रवेश सोहळ्यात सुनील उत्तम लाखे, आरिफ इब्राहीम सय्यद, राजेंद्र जनार्दन सपने, सहाम मोईन सय्यद, जुबेर वहीद मिर्झा, समीर अयुब अन्सारी, इरशाद शेख, गणेश दत्तात्रय रोंढळे, मोहन वाघमारे, माऊली बोंद्रे, किसन हिंगणकर, प्रवीण खोमणे, अशोक टापरे, ज्ञानेश्वर काळे, सचिन कचरे, जुनेद खान, कुदरद खान, जाकीर पठाण, नसीर बेग, आसीफ बेग, समीर शेख, अरबाज शेख, सलीम शब्बीर शेख, सर्जेराव हिवाळे, आकाश अशोक वाघमारे, अमजद खान, पवन गोयल, आयात खान, मुकुंद यादव, मझहर शेख, अब्दुल समी, समाधान पुजाराम लाखे, विजय वंकर लाखे, बबन आसाराम लाखे, प्रकाश डोईफोडे, शुभम सावळे, बाबासाहेब कारभारी वाघमारे, गोविंद हंगारे *(पान २ वर)*

# मंठा नाका, खरपुडी रोडवर महापालिकेची धडक कारवाई; तीन चिकन-मटन दुकाने सील

## आणखी तीन दुकानांवर दंडात्मक कारवाई; नियमभंग करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मंठा नाका रोड आणि खरपुडी रोड परिसरातील चिकन-मटन विक्री केंद्रांवर महानगरपालिकेने रविवारी (२३ ऑगस्ट) धडक कारवाई केली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीन चिकन-मटन दुकानांना सील करण्यात आले, तर आणखी तीन दुकानांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. अचानक करण्यात आलेल्या या कारवाईमुळे संबंधित व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार तसेच उपायुक्त त्रिंबक कांबळे आणि सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

शहरातील चिकन-मटन विक्री केंद्रांमध्ये स्वच्छता, परवाने आणि महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी पथकाने विविध दुकानांची पाहणी केली. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आढळलेल्या तीन दुकानांवर सीलची कारवाई करण्यात आली. तर अन्य तीन दुकानांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

चिकन-मटन विभागाचे प्रमुख मोहम्मद अमजद खान यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. सहाय्यक मुकेश गायकवाड, रामेश्वर जाधव, राहुल जाधव, राधेश्याम लोखंडे, राहुल लोखंडे, विक्रांत किर, सचिन धावडे यांच्यासह महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

महानगरपालिका प्रशासनाकडून शहरातील चिकन-मटन विक्री केंद्रांची तपासणी यापुढेही सुरू ठेवण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

रविवारी झालेल्या या कारवाईमुळे मंठा नाका आणि खरपुडी रोड परिसरातील चिकन-मटन विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे व्यावसायिकांचे लक्ष लागले आहे.

# नऊ महिन्यांपासून वेतन रखडले; शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ

## उपमुख्यमंत्री यांना प्रहारचे राज्य उपाध्यक्ष अविनाश तांदळे यांचे निवेदन

**जालना- प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील *श्री वैद्यनाथ विद्यालयातील माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर* कर्मचाऱ्यांचे मागील नऊ महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. वेतनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, या मागणीसाठी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश तांदळे यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन मागील नऊ महिन्यांपासून थकीत असल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक अडचणींचा सामना करण्याची वेळ आली आहे. याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी तीन दिवसांत वेतनाचा प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनाला एक महिना उलटूनही वेतनाचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेतन रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजावरही परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. दरम्यान *(पान २ वर)*



निसर्गाची किमया वेगळीच सुपारीच्या झाडामागे जणू काही सोन्याची डोंगरच उभे असल्याचे दिसून येत आहे **छायाचित्र किरण खानापुरे**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.